# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-2557266

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website: rdtenagpur.org.in**

**अत्यंत महत्वाचे**

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/150/2019/ 2182

दिनांक:- 18 JUL 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व विना अनुदानित पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्य आराखडयानुसार कार्यक्रमाचे आयोजन करून त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या 25 तारखेस सादर करण्याबाबत.
संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र. क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/150/2018/3541, दि. 24/10/2018

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्य संदर्भिय पत्रात **नमुद 14 कार्यक्रमानुसार** वर्षाभर कार्यक्रम आयोजित करून त्याबाबतचा अहवाल (फोटो, व्हीडीओ व माहितीसह) प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवडयात या कार्यालयाकडे सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू ब-यास संस्था त्यांचे संस्थेत कार्यक्रम आयोजित करून अहवाल या कार्यालयाकडे सादर करीता नाही, त्यामुळे नागपूर विभागाचा अहवाल विहित मुदतीत शासनाकडे सादर करता येत नाही.

शासनाने याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करून महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्य सर्व महाविद्यालय प्रत्येक महिन्यात कार्यक्रम आयोजित करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

**त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्य सोबतच्या आराखडयानुसार कार्यक्रम राबवून त्याबाबतचा अहवाल (फोटो, व्हीडीओ व माहितीसह) प्रत्येक महिन्याच्या 25 तारखेपर्यंत या कार्यालयाकडे सादर करावा.**

**सहपत्र:**- १४ कलमी आराखडा

(डॉ. चंद्रशेखर थोरात)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

| अ. क्र. | कार्यक्रमांचा विषय | ------------ या महाविद्यालयातंर्गत माहे ------2019 मध्ये राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा तपशिल |
|---|---|---|
| १ | महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर नाटकांचे रंगमंचावरील कार्यक्रम, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात | |
| २ | स्वच्छता अभियानांतर्गत कार्यक्रम सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजि त करावेत | |
| ३ | श्रमदानाचे कार्यक्रम सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत | |
| ४ | मानव संसाधन विकास विभागाने महाराष्ट्राशी ज्या दुसऱ्या राज्याची जोड करून दिलेली आहे त्या राज्याची संपर्क साधून विद्यार्थ्यांची देवान-घेवान कार्यक्रम राबविणे | |
| ५ | सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांचे गीत गायनाचे/ भजन गायनाचे कार्यक्रम आयोजित करावेत | |
| ६ | सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी या कालावधीत एक खेडे दत्तक घेऊन तेथील सामाजिक केंद्रांमध्ये स्वच्छता अभियान व स्वच्छ भारत अभियान यांची माहिती देवून तो उपक्रम राबवावा | |
| ७ | महात्मा गांधींचा त्यांच्या जीवनकालावधीत महाराष्ट्रातील ज्या शाळांशी संपर्क आला उदा. वर्धा, पवनार पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी पदयात्रा आयोजित करून जनजागृती करावी | |
| ८ | सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधीजींच्या विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात या विषयावर राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध व्यक्तींना भाषणे देण्यासाठी आमंत्रित करावे | |
| ९ | सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी विद्यार्थ्यांकडून सार्वजनिक ठिकाणी महात्मा गांधींच्या विचारांची भिंती चित्र तयार करून घ्यावीत व त्याचे मोठ्या प्रमाणात प्रदर्शन करावे | |
| १० | सर्व विद्यापीठ महाविद्यालय तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयामध्ये महात्मा गांधींच्या जीवनावरील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लेखकांनी लिहिलेली पुस्तके मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वाचकांसाठी उपलब्ध करून द्यावी तसेच गुजरात,राजस्थान, बिहार इत्यादी राज्यांनी महात्मा गांधीजींच्या विचारांवर आधारित काही पुस्तके प्रसिद्ध केली आहेत ती सुद्धा त्यांच्या वाचनालयात उपलब्ध करून देण्यात यावीत | |
| ११ | सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधीचे सामाजिक कार्य व विचारांचा सर्व राज्यात प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने वार्षिक दिनदर्शिका तयार करावी व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी | |
| १२ | बिहार शासनाने महात्मा गांधींच्या जीवनावर प्रसिद्ध केलेल्या बापू की कहानी या पुस्तकाचे मराठी भाषांतर करवून घेऊन ते पुस्तक सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयात उपलब्ध करून देणे संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी | |
| १३ | सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींच्या भजनांच्या गायनाचे कार्यक्रम या कालावधीत प्राधान्याने आयोजित करावेत | |
| १४ | सर्व विद्यापीठे महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या रॅली /पदयात्रा वेळोवेळी आयोजित कराव्यात व त्यात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अनिवार्य करावा | |